नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०१/०५/२०२५ (गुरूवार)**

---

## कस्तुरचंद पार्क (के.पी.) ग्राऊंड वर महाराष्ट्र दिन थाटात साजरा. नागपूर ग्रामीण पोलीस दलातील उमरेड उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी ए.एस.पी. श्रीमती वृष्टी जैन (भा.पो.से.) यांनी केला परेड पथसंचलन

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुध्दा दि. ०१ मे २०२५ रोजी नागपूरातील कस्तुरचंद पार्क ग्राऊंड वर ध्वजारोहनाचे व परेड चे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाची विशेष शोभा वाढली ती श्रीमती वृष्टी जैन (भा.पो.से.), उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग, नागपूर ग्रामीण यांच्या परेड कमांडर म्हणून पथसंचालनाने. महाराष्ट्र दिनानिमित्त एका वरिष्ठ महिला पोलीस अधिकाऱ्याने परेडचे पथसंचलन करणे हे खऱ्या अर्थाने महाराष्ट्र दिनाचे व महिलांचे गौरव वाढविणारे आहे. कार्यक्रमाच्या सुरूवातीला नागपूर जिल्ह्याचे पालक मंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांना परेड कमांडर श्रीमती वृष्टी जैन व पथकाने मानवंदना दिली व नंतर माननीय पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांचे हस्ते ध्वजारोहन करण्यात आले तसेच राष्ट्रीय ध्वजाला सलामी देवून राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीताचे गायण झाले. नंतर पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी परेड मधील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे निरीक्षण करून त्यांना महाराष्ट्र दिनाचे शुभेच्छा दिल्या तसेच उपस्थित मान्यवर व नागरिकांची भेट घेवून सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमात नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे महसुल मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, रामटेक लोकसभा क्षेत्राचे खासदार श्री. श्यामकुमार बर्वे, विभागीय आयुक्त श्रीमती विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त श्री. रविंद्र सिंगल, जिल्हाधिकारी श्री. विपीन इटनकर, सह.पोलीस आयुक्त श्री. निसार तांबोळी, सेवानिवृत्त अपर पोलीस महासंचालक श्री

भुषणकुमार उपाध्याय, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर श्री. दिलीप भुजबळ पाटील, पोलीस महानिरीक्षक नक्षल अभियान नागपूर श्री. संदिप पाटील, नागपूर ग्रामीण जिल्हा प्रभारी पोलीस अधिक्षक श्री. रेमश धुमाळ तसेच ईतर वरिष्ठ अधिकारी व मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.










## चोरी च्या गुन्ह्यात हस्तगत केलेला मुद्देमाल फिर्यादि यांना परत करून पोलीस ठाणे नरखेड येथे साजरा करण्यात आला महाराष्ट्र दिन

पोलीस स्टेशन नरखेड येथे दि. ०१ मे २०२५ रोजी काटोल नरखेड विधानसभा क्षेत्राचे आमदार मा. श्री. चरणसिंग ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र स्थापना दिवस व कामगार दिवस साजरा करण्यात आला. महाराष्ट्र दिनाच्या औचित्यावर पोलीस ठाणे नरखेड येथील उघडकीस आलेल्या चोरीच्या गुन्ह्यातील हस्तगत केलेला मुद्देमाल हा गुन्ह्यातील फिर्यादि यांना यावेळी परत करण्यात आला. सदर कार्यक्रमात श्री. बापू रोहेम, उपविभागीय पोलीस अधिकारी, काटोल विभाग, काटोल, श्री. अजित कदम, ठाणेदार, पोलीस स्टेशन नरखेड तसेच नरखेड चे पोलीस पाटिल व परिसरातील नागरिक उपस्थित होते.




HONDA

## अवैधरित्या देशी/मोहाफुल दारू विक्री करणाऱ्या व दारू काढणाऱ्या आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन उमरेड ची धडक कारवाई एकूण ९ ठिकाणी छापेमारी करून ९ गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक ३०/०४/२०२५ रोजी पोलीस स्टेशन उमरेड येथील पोलीस स्टॉफ ने पो.स्टे. उमरेड हद्दीतील मौजा **पारधी बेडा राजुरवाडी, गरडेपार, दहेगाव पारडी बेडा, बुधवारीपेठ, तारणा कूही पूर्व , जोगीठाणापेठ** अशा विविध ठिकाणी अवैधरित्या देशी दारू बाळगून विक्री करणारे तसेच मोहफुलाची गावठी दारू तयार करणाऱ्या भट्टी वर छापा टाकूण एकूण ९४,८०० रू. किंमतीची देशी दारू, मोहफुलाची दारू व मोहफुलांचा सडवा आणि दारू काढण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात आले आहे. आरोपी नामे १) सुरज ज्ञानेश्वर राजपुत वय ३२ वर्ष रा पारधी बेळा राजुरवाडी तह उमरेड २) महेश चिजामण शिवनकर वय ३४ वर्ष रा बुधवारीपेठ उमरेड तसेच ७ महिला आरोपी असे **एकूण ९ आरोपींविरूध्द ९ गुन्हे दाखल केले आहे.**

## अवैधरित्या देशी/मोहाफुल दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हे नोंद पोलीस स्टेशन काटोल, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी एकूण ५ कारवाया ५ गुन्हे नोंद

दिनांक ३०/०४/२०२५ रोजी पोलीस स्टेशन काटोल येथील पोलीस स्टॉफ ला अवैध दारू विक्रीबाबत मिळालेल्या गुप्त बातमी वरून पोलीस स्टेशन काटोल येथील पोलीस स्टॉफ ने पो.स्टे. काटोल हद्दीतील मौजा **सोनगाव शिवार, मेंढेपठार बस स्टॉप, येनवा तसेच मातंगपूरा असे विविध ठिकाणी** अवैधरित्या देशी संत्रा व मोहफुलाची गावठी दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकूण एकूण २४६०/— रू. ची देशी संत्रा व मोहफुलाची दारू जप्त करण्यात आली आहे. आरोपी नामे १) देवेन्द्र धंतपाल पवार रा. मेंढेपठार ता. काटोल जि. नागपुर २) गोंविदा बाबाराव मानकर रा. रा. मेंढेपठार ता. काटोल जि. नागपुर ३) नामदेव मारोती ताकतोडे रा. मांतगपुरा ता. काटोल जि. नागपुर ४) गजानन रामदास श्रीरसागर रा. मेंढेपठार ता. काटोल जि. नागपुर, ५) एक महिला आरोपी असे **एकूण ५ आरोपींविरूध्द ५ गुन्हे दाखल केले आहे.**

## अवैधरित्या मोहाफुलांची दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हे नोंद पोलीस स्टेशन जलालखेडा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी एकूण २ कारवाया २ गुन्हे नोंद

दिनांक ३०/०४/२०२५ रोजी पोलीस स्टेशन जलालखेडा येथील पोलीस स्टॉफ ला अवैध दारू विक्रीबाबत मिळालेल्या गुप्त बातमी वरून पोलीस स्टेशन जलालखेडा येथील पोलीस स्टॉफ ने पो.स्टे. जलालखेडा हद्दीतील मौजा दावसा ता. नरखेड मौजा बानोर सिंगबेडा ता. नरखेड या **ठिकाणी** अवैधरित्या मोहफुलाची गावठी दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकूण एकूण ३०००/— रू. ची मोहफुलाची दारू जप्त करण्यात आली आहे. आरोपी नामे १) लक्ष्मण पांडुरंगजी दोडके वय ४३ वर्ष, रा. मेंढला ता. नरखेड सतवनसिंग मनोहरसिंग बावरी वय ३५ वर्ष, रा. बानोज सिंगबेडा ता. नरखेड असे **एकूण २ आरोपींविरूध्द २ गुन्हे दाखल केले आहे.**

## अवैधरित्या देशी/विदेशी दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कळमेश्वर ची कारवाई. एकूण ३ गुन्हे नोंद

दिनांक ३०/०४/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील पोलीस स्टॉफ ला अवैध दारू विक्रीबाबत मिळालेल्या गुप्त बातमी वरून पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील पोलीस स्टॉफ ने पो.स्टे. कळमेश्वर हद्दीतील **सावनेर ते बैतुल हायवे रोड उमरी, वार्ड क्र ०२ चिंचभवन खदान कळमेश्वर व चौदामैल ते गोंडखैरी रोड कळमेश्वर** या **ठिकाणी** अवैधरित्या देशी/विदेशी दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकूण एकूण ८७५५/— रू. ची देशी/विदेशी दारू जप्त करण्यात आली आहे. आरोपी नामे १) विजय डोमाजी काळे वय ५० वर्ष रा. उमरी २) अमोल मनोहर बावणे, वय ३२ वर्ष राह. वार्ड क्र. ०१ व्याहाळ ता. जिल्हा नागपूर ३) एक महिला आरोपी असे **एकूण ३ आरोपींविरूध्द ३ गुन्हे दाखल केले आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने